प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
Nagar Edition 25 June 2025_003
25 Jun 2025
www.dainikprabhat.com

# ‘अर्बन’च्या ठेवीदारांना जुलैमध्ये ५० टक्के रक्कम मिळणार

## अवसायक गणेश गायकवाड यांची माहिती

**अहिल्यानगर, दि. २४ (प्रतिनिधी)** - अवसायानात निघालेल्या नगर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या ठेवीदारांसाठी मोठा दिलासा देणारी माहिती समोर आली आहे. पाच लाखांपेक्षा जास्त रकमेची ठेव पावती असलेल्या ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळणार असल्याची माहिती बँकेचे अवसायक गणेश गायकवाड यांनी दिली.

याबाबत डीआयसीजीसी यांच्याकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार डीआयसीजीसी कार्यालयाकडून तसे ना हरकत प्रमाणपत्र नुकतेच बँक प्रशासनास प्राप्त झाले आहे. त्यामुळे पाच लाखांपेक्षा जास्त ठेव रकम असलेल्या व विहित नमुन्यातील क्लेम फॉर्म व केवायसी अद्ययावत केलेल्या १९२६ ठेवीदारांना ठेव पावतीच्या ५० टक्के इतकी रक्कम जुलै महिन्यात मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या ठेवी परत करण्याचा पहिला टप्पा पूर्ण झाला असून दुसऱ्या टप्प्याचे आरबीआय शी निगडित कामकाज जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पूर्ण झाल्यानंतर या रकमा ठेवीदारांच्या खात्यात वर्ग करण्यात येणार आहे, अशी माहिती बँकेचे अवसायक गायकवाड यांनी दिली.